महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217


**महत्त्वाचे**

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी(१९-२०)/पुवि/२०१९/3600
दिनांक :- 17 MAY 2019

प्रति,

सर्व झोन प्रमुख
झोन सहाय्यक/ पर्यवेक्षिय अधिकारी,
झोन निहाय संपर्क प्रमुख
(पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र)

विषय :- **इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० संदर्भात विद्यार्थी व पालक यांचे उद्बोधन वर्ग**

इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश सन २०१९-२० साठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांची ऑनलाईन प्रवेश सुरु होत आहे. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी माहिती पुस्तिकांचे वितरणाचे काम सद्या चालु आहे. दि. २५.०५.२०१९ रोजी पासून प्रवेश अर्जाचा भाग-१ भरणे सुरुवात झालेली आहे.

इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील अर्जाचा भाग-१ व भाग-२ कसा भरावा, आरक्षणाच्या प्रकारानुसार कोणती कागदपत्रे सादर करावीत, ॲप्रुव्हल कशा प्रकारे दिले जाणार आहे. याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन या उद्बोधन वर्गात दिले जाणार आहे जेणे करुन विद्यार्थी व पालकांना प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरतांना कोणतीही अडचण राहणार नाही. दिनांक २२ व २३ मे २०१९ रोजी खालील नमुद केलेल्या ठिकाणी उदबोधन वर्ग विद्यार्थी व पालक यांच्या साठी घेण्यात येणार आहे. तरी सदर उदबोधन वर्गास संबधित झोन मधील भागातील पालक व विद्यार्थी यांनी उपस्थित राहुन उदबोधन वर्गाचा लाभ घ्यावा.

खालील नियोजनाप्रमाणे उद्बोधन वर्गाचे नियोजन झोनस्तरावर करुन झोन समिती व मार्गदर्शन केंद्र समिती यांच्या समन्वयाने सदर उद्बोधन वर्ग यशस्वीपणे पार पाडावेत.

| अ.क्र. | झोन क्रमांक व झोनचे नांव | उद्बोधन वर्गाचे ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | १- (पुणे शहर विभाग) | राजीव गांधी इ-लर्निंग स्कूल , सहकारनगर, पुणे-९ | दि.२२.०५.२०१९ सकाळी ११ ते १२ |
| २ | ४- (सिंहगड विभाग) | रावसाहेब पटवर्धन माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, दांडेकर पुला शेजारी पुणे | दि.२२.०५.२०१९ दुपारी १ ते २ |
| ३ | ७- (शिवाजीनगर/औंध/पाषाण विभाग) | मॉडर्न असेंब्ली हॉल, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे-५ | दि.२२.०५.२०१९ दुपारी ३ ते ४ |
| ४ | ६- (हडपसर विभाग) | सी बी तुपे कन्या शाळा सभागृह, हडपसर पुणे | दि.२२.०५.२०१९ सायं. ५ ते ६ |
| ५ | ८- (पिंपरी/भोसरी विभाग) | म्हाळसाकांत कनिष्ठ महाविद्यालय,आकुर्डी पुणे | दि.२२.०५.२०१९ दुपारी ११ ते १२ |
| ६ | ९-(चिंचवड/निगडी विभाग) | म्हाळसाकांत कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी पुणे | दि.२२.०५.२०१९ दुपारी ३ ते ४ |

Scanned by CamScanner

| अ.क्र. | झोन क्रमांक व झोनचे नांव | उद्‌बोधन वर्गाचे ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| ७ | ५ (कॅम्प/येरवडा विभाग) | टाटा अँसेंबली हॉल, नौरोसजी वाडिया कॉलेज, रुबी हॉल शेजारी पुणे-१ | दि.२३.०५.२०१९ सकाळी ११ ते १२ |
| ८ | ३ (पर्वती/धनकवडी/ स्वारगेट विभाग) | राजीव गांधी ई-लर्निंग स्कूल, सहकार नगर पुणे-९. | दि. २२.०५.२०१९ दुपारी १ ते २ |
| ९ | २ (कर्वे नगर/कोथरुड विभाग) | कलमाडी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कर्वे रोड पुणे | दि. २३.०५.२०१९ दुपारी ३ ते ४ |

सदरचे परिपत्रक या कार्यालयाचे **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(मिनाक्षी राऊत)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे

२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे

Scanned by CamScanner